सतार वाजवण्याच्या पद्धती :

सतारवादनात प्रभुत्व मिळवणे अतिशय अवघड आहे. उजव्या हाताच्या तर्जनीवर घातलेल्या मिझराबाने (नखीने) तार छेडली जाते. उजव्या हाताचा अंगठा खालच्या भोपळ्यावर दाबून धरल्याने उजवा हात स्थिर राहतो. सतार वादन हे प्रामुख्याने आलाप, जोड, झाला या क्रमाने वाजवून गत वाजवली जाते. चिकारीच्या तारेवर पहिल्या बोटाने किंवा करंगळीने झंकार निर्माण करतात, यालाच झाला असे संबोधले जाते. या वाद्याला तबला वाद्याची साथ असते. अलीकडील काळात तबल्याबरोबर पखवाजही साथीसाठी घेतला जात आहे.

विलंबित, मध्य, द्रुत, अतिद्रुत गतीचे व मींडयुक्त स्वरांचेही वादन या वाद्यामध्ये करता येते.

सतार वाद्याची लोकप्रियता व कलावंतांचे योगदान :

अमीर खुसरो यांची दोन मुले फिरोज खाँ आणि मसजिद खाँ ही सतारवादनात पारंगत होती तर आधुनिक काळातील उ. विलायत खाँ, पं. रविशंकर या आंतरराष्ट्रीय कलाकारांनी देशविदेशात या वाद्यांचे वादन करून या वाद्याला व भारतीय संगीताला ही मोठी प्रतिष्ठा मिळवून दिली.

५.२ सनई (शहनाई)

भारतीय संगीतातील एक मंगल वाद्य म्हणून सनई या सुषिर वाद्याची अमाप लोकप्रियता आहे. सार्वजनिक समारंभ, मिरवणुका, शोभायात्रा, शुभप्रसंग याशिवाय शास्त्रीय, उपशास्त्रीय, सुगम व फिल्म संगीतात सार्वत्रिक वावर असलेले वाद्य म्हणून सनई या वाद्याला प्रतिष्ठा मिळाली आहे. उत्तर भारतात या वाद्याला शहनाई असे म्हणतात.



सनईचा इतिहास व विविध संदर्भ :

तोंडाने फुंकून वाजवले जाणारे एक सुषिर वाद्य म्हणून सनईला ओळखले जाते. सनईला सुर्ना, नाई, शहनाई अशी अनेक नावे आहेत. दाक्षिणात्य संगीतातील नादस्वरम् हे वाद्य सनईसदृश वाद्य आहे. सनई हे वाद्य इराणमधून भारतामध्ये आल्याचे एक मत आहे. इराणी वाद्य सुर्ना किंवा नाई आणि त्याचे बदललेले स्वरूप म्हणजे सनई वाद्य असल्याचा उल्लेख आढळतो. एका नाईवादकाच्या नाईवादनाने संतुष्ट होऊन या वाद्याचे शाह-ए-नाई असे नाव पडले व त्यातूनच पुढे शहनाई असा या वाद्याचा उल्लेख झाला असे म्हणतात.

मतंगऋषींच्या बृहद्देशी या ग्रंथात महुवरी किंवा मुहरी या वाद्याचा उल्लेख आलेला आहे. हे वाद्यपण सनईसदृश असल्याचे मानतात. भारतीय अनेक सुषीर वाद्यांमध्ये रिडवाद्याचा वापर इतिहासपूर्व काळापासून होतो. शारंगदेवाच्या संगीत रत्नाकर या ग्रंथात मधुकरी या वाद्याचा उल्लेख आढळतो. हेसुद्धा सनईचेच रूप मानले जाते. सर्वसाधारणपणे सतराव्या-अठराव्या शतकात अशा रिडवाद्यांची नावे बदललेली दिसून येतात.

सनईची रचना :

सनईचे प्रामुख्याने चार भाग आढळतात.

१) जिभाळी २) पावी ३) नळी ४) अन्नस

सनईची नळी ही ६० ते ९० सेमी लांबीची असते. खैर, शिसम, चंदन या लाकडापासून ती बनवतात. गोलाकार व आतून पोकळ अशी याची रचना असते. ती सरळ लांबीची असून एका टोकाला बारीक व दुसऱ्या टोकाला रुंद होत गेलेली असते. बारीक टोकाकडून ती फुंकली जाते. नळीच्या रुंद टोकाला आवाज फेकण्यासाठी घंटाकार कर्णा असतो, त्याला 'पावी' असे म्हणतात. लाकडाच्या कांडीत पानाची दोन पत्तीची जिभाळी घट्ट बसवली जाते. सनईमध्ये आठ वादनरंध्रे व चार नियमनरंध्रे असतात. सनईच्या नळीवरची सात रंध्रे वाजवण्यासाठी वापरतात व बाकीची मोकळी किंवा मेणाने बंद करतात. सनईच्या शेवटी कर्ण्याच्या आकारासारखे धातूचे भांडे बसवलेले असते त्याला 'अन्नस' असे म्हणतात.

सनईची वादन पद्धती :

सनई हे वाद्य आनंदाबरोबरच दुःखद प्रसंगीही वाजवले जाणारे वाद्य आहे. आता सनईमधून ख्याल, ठुमरी, चैती, कजरी व भावसंगीतही वाजू लागले आहे. अनेक वर्षांपासून आकाशवाणीच्या बहुसंख्य केंद्रांवर कार्यक्रमांची सुरुवात सनई वादनाने होत आहे. सनई वाद्यावर शास्त्रीय संगीताची अभिव्यक्ती होऊ शकते. अनेक असामान्य, प्रतिभावंत कलाकारांनी गायकी ढंगाने सनई वाजवण्याचे यशस्वी प्रयत्न करून ते सार्थ ठरवले.

सनई वादन करताना प्रामुख्याने ओठ, जीभ व हातांच्या बोटांचा वापर महत्त्वपूर्ण ठरतो. वादन श्रवणीय, कर्णमधुर होण्यासाठी नळीतील हवेच्या दाबावर नियंत्रण मिळवावे लागते. त्यामुळे वाद्य छोटे असले तरी यामध्ये परिश्रमाला पर्याय नाही.

सनई वादनाच्या साथीसाठी सूरपेटीची नितांत आवश्यकता असते. सनईवादन चालू असताना फुंकर अखंड ठेवून त्या माध्यमातून आधारस्वर सतत गुंजत ठेवतात. नगारा, चौघडा, खुर्दक या वाद्याबरोबरच अलीकडील काळात तबला या वाद्याची साथ घेतली जाते.


सनई वाद्याची लोकप्रियता व कलावंतांचे योगदान :

भारतरत्न उ. बिस्मिल्ला खाँ हे जागतिक दर्जाचे सनईवादक होते. उ. बिस्मिल्ला खाँ यांचे वडील पैगंबर बख्श, मामा अलिबख्श, बंधू शमसुद्दीन खाँ, सुपुत्र नझिम खाँ या सर्व कलावंतांचे सनई वादनातील योगदान महत्वपूर्ण आहे.

अन्य कलावंतांमध्ये अली अहमद हुसेन, बलजीतसिंग नामधारी, कृपाल सिंग, गुरुबक्ष सिंग, अनंतलाल, सूर्यकांत खळदकर, शंकरराव गायकवाड, प्रमोद गायकवाड, तुकाराम दैठणकर, नम्रता गायकवाड हे सनई वादनासाठी प्रसिद्ध आहे.

५.३ जलतरंग

भारतीय संगीतामधील घनवाद्य म्हणजे जलतरंग होय. प्राचीन काळापासून वर्तमानकाळापर्यंत या वाद्यांमध्येही अनेक लक्षणीय बदल घडून आले.



जलतरंगची ऐतिहासिक पार्श्वभूमी व त्याचे विविध संदर्भ :

जलतरंग हे प्राचीन भारतीय वाद्य आहे. या वाद्याचा शोध चौथ्या ते सहाव्या शतकादरम्यान लागल्याचे मानले जाते. या वाद्याला जलवाद्य, उदक किंवा जलतंत्री वीणा असेही म्हटले जाते. पूर्वीच्या काळी धातूच्या भांड्यामध्ये पाणी ठेवून वाजवले जाणारे हे वाद्य अलीकडील काळात मात्र चिनीमातीचे बाऊल वापरून वाजवले जाते. कृष्णाच्या काळामध्ये या वाद्याला जलयंत्र या नावाने ओळखले जायचे.

जलतरंगची रचना :

यामध्ये चिनीमाती, धातू किंवा पितळेच्या वेगवेगळ्या आकाराच्या वाट्या असतात. कमीतकमी बारा, जास्तीत जास्ती सव्वीस लहानमोठ्या आकाराच्या वाट्या यामध्ये वापरतात. अर्धगोलाकार पद्धतीने या सर्व वाट्यांची मांडणी केली जाते व त्यामध्ये पाण्याचा स्वरानुरूप वापर केला जातो.

जलतरंगाची वादन पद्धती :

रागाच्या, गीताच्या अनुषंगाने अनेक लहान मोठ्या वाट्या कमी जास्त पाणी भरून अर्धगोलाकार रचना करून जलतरंगाचे वादन करावे लागते.

जलतरंग लाकडी काड्यांनी वाजवले जाते. पाणी भरलेल्या वाट्यांच्या कडांवर लाकडी काड्यांनी हलकेच टिचकीसारखा आघात करून यातून नाद निर्माण केला जातो. या आघाताने पाण्यावर तरंग उठतात आणि त्यातून वादक आपल्या कौशल्याने संगीताची वैविध्यपूर्ण निर्मिती करतो. काड्या किती जोरात वा हलके मारायच्या हे त्या त्या कलावंताचे कौशल्य असते.

जलतरंग वादक व त्याचे योगदान :

जलतरंग या वाद्याला सर्वत्र प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महत्वपूर्ण कार्य अनेक कलावंतांनी केलेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने कुमार पंकज साखरकर, पं. दत्तोपंत मंगळवेढेकर, रामराव परसातवार, मास्तर बर्वे, शंकर विष्णू कान्हेरे, मिलींद तुळाणकर, सिता दोरया स्वामी, रागिणी त्रिवेदी इत्यादी.

स्वाध्याय

१) **वाद्यांच्या दुकानामध्ये जाऊन विविध वाद्यांची रचना समजून घ्या.**

२) **वाद्यवादनासाठी प्रसिद्ध असलेल्या विविध कलाकारांची यादी तयार करा.**

३) **वाद्यवादकांच्या मुलाखती घेऊन वाद्यांविषयी अधिक माहिती मिळवा.**

४) **खालील वाद्यांची रचना सांगा.**

(अ) सतार (क) जलतरंग

(ब) सनई

उपक्रम : इंटरनेटच्या सहाय्याने सतार, सनई आणि जलतरंग वादकांची अधिक माहिती मिळवा, तसेच परिसरातील प्रसिद्ध गायकांच्या मुलाखती/भेटी घ्या.

६. तालपरिचय

६.१ ताल : दिपचंदी (उपशास्त्रीय गीतप्रकारांसाठी उपयुक्त)

मात्रा : १४

विभाग : ४ (३-४-३-४ मात्रांचे)

टाळ्या : ३ (१, ४ व ११ व्या मात्रेवर)

काल : १ (आठव्या मात्रेवर)

मात्रा	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४
ठेका	धा	धीं	ऽ	धा	धा	धीं	ऽ	ता	तीं	ऽ	धा	धा	धीं	ऽ
चिन्ह	×			२				०			३			

६.२ ताल : धुमाळी (नाट्य संगीत व सुगम संगीतासाठी उपयुक्त)

मात्रा : ८

विभाग : २ (४-४ मात्रांचे)

टाळ्या : १ (१ ल्या मात्रेवर)

काल : १ (पाचव्या मात्रेवर)

मात्रा	१	२	३	४	५	६	७	८
ठेका	धीं	धीं	धा	तीं	त्रक	धीं	धागे	त्रक
चिन्ह	×				०			

६.३ ताल : धमार (धमार या गीतप्रकारांसाठी उपयुक्त)

मात्रा : १४

विभाग : ४ (५-२-३-४ मात्रांचे)

टाळ्या : ३ (१, ६ व ११ व्या मात्रेवर)

काल : १ (आठव्या मात्रेवर)

मात्रा	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४
ठेका	क	धि	ट	धि	ट	धा	ऽ	ग	ती	ट	ती	ट	ता	ऽ
चिन्ह	×					२		०			३			

६.४ ताल : एकताल (शास्त्रीय व सुगम संगीतासाठी उपयुक्त)

मात्रा : १२

विभाग : ६ (२-२ मात्रांचे)

टाळ्या : ४ (१, ५, ९ व ११ व्या मात्रेवर)

काल : २ (३ व ७ व्या मात्रेवर)

मात्रा	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
ठेका	धीं	धीं	धागे	त्रक	तू	ना	क	ता	धागे	त्रक	धी	ना
चिन्ह	×		०		२		०		३		४	

६.५ ताल : चौताल (धृपद या गीतप्रकारांसाठी उपयुक्त)

मात्रा : १२

विभाग : ६ (२-२ मात्रांचे)

टाळ्या : ४ (१, ५, ९ व ११ व्या मात्रेवर)

काल : २ (३ व ७ व्या मात्रेवर)

मात्रा	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
ठेका	धा	धा	दीं	ता	तीट	धा	दीं	ता	तिट	कत	गदि	गन
चिन्ह	×		०		२		०		३		४	

६.६ ताल-खेमटा (लोकसंगीत, सुगम संगीत व सिनेसंगीतासाठी उपयुक्त)

मात्रा : ६

विभाग : २ (३-३ मात्रांचे)

टाळी : १ (पहिल्या मात्रेवर)

काल : १ (चौथ्या मात्रेवर)

मात्रा	१	२	३	४	५	६
ठेका	धीन	धाती	धाधा	तीन	ताती	धाधा
चिन्ह	×			०		

६.७ ताल–भजनी (भक्तीसंगीत व किर्तनासाठी उपयुक्त)

मात्रा : ८

विभाग : २ (४–४ मात्रांचे)

टाळी : १ (पहिल्या मात्रेवर)

काल : १ (पाचव्या मात्रेवर)

मात्रा	१	२	३	४	५	६	७	८
ठेका	धिंऽ	नाधीं	ऽधीं	नाऽ	धिंऽ	नातीं	ऽतीं	नाऽ
चिन्ह	×				०			

स्वाध्याय

प्र. १ तक्ता तयार करा.

ताल	मात्रा	खंड	सम	काल	टाळी	कोणत्या गीतप्रकारासाठी
दिपचंदी						
धुमाळी						
धमार						
एकताल						
चौताल						

प्र. २ रिकाम्या जागा भरा.

(१) धमार हा .... मात्रांचा ताल आहे.

(२) दिपचंदी तालाचा काल .... मात्रेवर आहे.

(३) धुमाळी तालाचे खंड ..... मात्रांचे आहे.

(४) धमार ताल .... या गीतप्रकारासाठी उपयुक्त आहे.

प्र. ३ एकताल आणि चौताल या तालांमधील साम्यभेद लिहा.

प्र. ४ दिपचंदी आणि धमार या तालांमधील साम्यभेद लिहा.

उपक्रम : अभ्यासक्रमातील तालांवर आधारीत चित्रपटगीतांची यादी तयार करा.

७. नृत्य

७.१ भरतनाट्यम् (दक्षिण भारत)

भरतनाट्यम हे मूळ दक्षिण भारतातील शास्त्रीय नृत्य असून आजकाल ते संपूर्ण भारतात लोकप्रिय आहे. हे शास्त्रीय नृत्य मूळात देवदासी करत असत. उत्तरेच्या मानाने दक्षिण भारतावर परकीय आक्रमणे कमी झाल्यामुळे दक्षिणी संगीतावर त्याचा परिणाम फारसा झाला नाही. त्यामुळे भरतनाट्यमचे मूळ रूप, त्याची प्राचीन प्रणाली आजही शुद्ध स्वरूपात पहायला मिळते. या नृत्य प्रकारात शास्त्रीय मुद्रांचा अधिक उपयोग केला जातो. त्यात किरकोळ कथाही सापडतात, पण कथ्थक नृत्याप्रमाणे यामध्ये कथानक नसते. भरतनाट्यम या नृत्यासाठी खास करून मृदंगम, बासरी, व्हायोलिनची साथ असते आणि त्याच्या जोडीला कर्नाटकी गीते गायली जातात. वाद्यांवरही कर्नाटकी सुरावट असते. भरतनाट्यम या नृत्यप्रकारात कर्नाटकी संगीताचा वापर केला जातो.



नृत्याचा क्रम :

भरतनाट्यम् या नृत्यप्रकाराचे मुख्यतः सात भाग पडतात, त्या भागांना मार्गम् असे म्हणतात. १) अल्लारिपू २) जतिस्वरम् ३) शब्दम् ४) वर्णम् ५) पदम् ६) तिल्लाना ७) श्लोकम्

भरतनाट्यम्‌ची वेशभूषा :

या नृत्यप्रकारात महाराष्ट्रीयन नऊवारीसारखी दिसणारी साडी नेसतात. साडी शिवलेली असते. दोन्ही पायांच्यामध्ये चुणीदार पंखा असतो. अंगावरून दुपट्ट्याचा पदर घेतलेला असतो व तो पाठीमागून कमरेला खोचलेला असतो. अर्ध्या हातांच्या बाह्यांचे ब्लाऊज असते. संपूर्ण वेशभूषेचे कापड जरीकाठांचे, रेशमी किंवा कांजीवरमचे असते. कमरपट्टा, गळ्यात व कानात आभूषणे, भांगामध्ये बिंदी, डोक्यावर खड्यांचे चंद्र आणि सूर्य, केसांची सुरेख रचना लांब वेणीच्या रूपात करतात. वेणीवर गजरा व भरपूर फुले लावून वेणीची आकर्षकता वाढवली जाते. स्त्रीच्या रूपाला पावित्र्य, मोहकता आणि बांध्याला उठाव देणारी अशी ही वेशभूषा असते. छानसा मेकअप (रंगभूषा) असतो.

अलीकडे भरतनाट्यम्‌मध्ये जावली हाही एक प्रकार सादर करतात. यातील शृंगार सर्वसामान्य माणसास समजणारा असतो. नायक-नायिका सर्वसामान्य जनतेचे प्रतिनिधित्व करतात. नटनममध्ये नटराजाची स्तुती असते.

७.२ कुचिपुडी

कुचिपुडी हे आंध्रप्रदेशातील एक पारंपरिक नृत्य नाट्य आहे जिचा आज शास्त्रीय नृत्य शैली म्हणून बराच विकास झाला आहे. आंध्रप्रदेशात कुचिपुडी नावाचे गाव असून हे संपूर्ण गाव गेल्या अनेक वर्षांपासून 'कुचिपुडी' नृत्यशैलीची साधना करीत आहे.

कुचिपुडी या नृत्यशैलीचा विकास कृष्णदेव आर्य यांच्या काळात झाला. वैष्णव भक्तीने ओतप्रोत भरलेला हा नृत्यप्रकार असून सहाव्या शतकातील भक्ती संप्रदायाची चळवळ पुढे नेण्यात या कला प्रकाराचे विशेष योगदान आहे. कुचिपुडी या गावात रामायणातील कथा या गीत, नृत्य आणि अभिनयाच्या माध्यमातून सादर करणारे नट समूह आहेत. त्या समूहाला 'कुलशीव' असे म्हणतात. यामध्ये अधिकतर पुरुष पात्राचा सहभाग असतो. भरतनाट्यम् आणि ओडिसी नृत्यशैलीचा समन्वयही या नृत्यप्रकारात साधला गेलेला दिसतो. सतराव्या शतकात सिद्धेंद्र योगी यांनी कुचिपुडी गावातील युवकांना बरोबर घेऊन हा नृत्यकलाप्रकार जगासमोर आणला.



हिंदू धर्म आणि त्यातील पौराणिक कथा यांची परंपरा जतन करून ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य या नृत्यशैलीने केले आहे.

या नृत्यशैलीमध्ये 'शब्दम' या प्रकाराची प्रधानता असते. भरतनाट्यमप्रमाणेच यात तिल्लाना हा प्रकारही सादर होतो. पदलालित्य हे या शैलीचे महत्त्वाचे अंग मानले जाते. नृत्याच्या शेवटी कलावंत थाळीमध्ये नर्तन करतो. हे नृत्य स्वतंत्र आणि लयदार पद्धतीने केले जाते. लास्य आणि तांडव या दोन्हीचे मिश्रण यात असते. प्रत्येक नर्तक हा तालाच्या साथीने नृत्य करत रंगमंचावर प्रवेश करतो. ह्या नृत्य शैलीवर संस्कृत कवी जयदेव यांच्या गीतगोविंद या काव्याचा प्रभाव जाणवतो.

विजयनगर साम्राज्याचा राजा कृष्णदेवराय याने या नृत्याला प्रोत्साहन दिले.

या नृत्यासाठी नर्तक वापरत असलेला पोषाख हा भरतनाट्यम नृत्यशैलीच्या पोषाखासारखाच असतो. अंगसंचालन स्प्रिंगप्रमाणे वरखाली पद्धतीने असल्याने शरीरातील प्रत्येक भागावर अधिक मेहनत घेणे गरजेचे असते.

कुचिपुडी हे मुख्यतः नाट्य असल्यामुळे यात नृत्याबरोबर अभिनयाला अधिक प्राधान्य दिले जाते.

७.३ लावणी

लावणी हा महाराष्ट्राच्या लोकनृत्यांमधील महत्त्वाचा नृत्यप्रकार आहे. तर 'लवण म्हणजे सुंदर' लवण या शब्दावरून लावण्यगीत वा लावणी शब्द तयार झाला आहे.

लावणी हा कलाप्रकार शृंगार, वीरता वा भक्ती या रसांचा परिपोष करण्यासाठी पूरक असे माध्यम समजला जातो. 'लास्य' रसाचे दर्शन घडवणारी लावणी हा महाराष्ट्रातील अतिशय लोकप्रिय लोककला प्रकार आहे. लास्य रस म्हणजे शृंगाराचा परिपोष असणारा रस होय. लावणी म्हणजे गीत, नृत्य आणि अदाकारी (नृत्यातील भाव) यांचा त्रिवेणी संगम. लावणीच्या साथीला तुणतुणे, ढोलकी व पायपेटी ही वाद्ये प्रामुख्याने वाजवली जातात.



लावणीच्या उत्पत्तीविषयी दोन स्वतंत्र विचार प्रवाह आहेत. लावणीचे मूळ हे संतांच्या विराण्या, गवळण, अभंग यात दिसते. संतांचे संस्कार घेऊन शाहीरांनी ज्या विविध रसांच्या रचना केल्या त्यात लावणीचा समावेश होता. महाराष्ट्रातील संतांचे संस्कार हे तंतांवर (शाहीरांवर) होते. बाराव्या तेराव्या शतकात महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात जी अध्यात्मिक क्रांती झाली त्या क्रांतीपर्वात अनेक संत उदयाला आले. ते भिन्न जातीपातीचे होते. संताचा हा कार्यकाळ थेट सतराव्या शतकापर्यंतचा मानला जातो. त्यानंतर तंतांचा उदय झाला. ज्यात प्रभाकर, रामजोशी, सगनभाऊ, हैबती, अनंत फंदी आदींचा समावेश होता. या शाहीरांनी अनेक गण, लावण्या रचल्या त्या सर्व लावण्या शृंगारिक होत्या असे नव्हे तर वीररस प्रधान व वात्सल्यप्रधानही होत्या. विसाव्या शतकात पठ्ठे बापूराव, भाऊ फक्कड, अर्जुना वाघोलीकर, हरि वडगावकर, दगडू बाबा साळी, कवी बशीर आणि मोमीन कवठेकर आदी कलावंतांनी गण, गवळण, लावण्या अशी कथागीते रचली. या कथागीतांचीच पुढे वगनाट्ये झाली. लावणीकार बशीर, मोमीन कवठेकर यांनी तब्बल पन्नास वर्षे तमाशा सृष्टीला आपल्या लेखणीतून विविध प्रकारचे मनोरंजनात्मक साहित्य पुरवले. लावणी, गण, गवळण, पोवाडे, सवाल-जवाब आणि वग नाट्य अशा

सर्व प्रकारच्या लेखातून त्यांनी भरीव असे योगदान दिले आहे. 'भृंगावती' गेय रचना म्हणजे लावणी. लावणी म्हणजे चौकाचौकात पदबंध लावत जाणे. कृषिप्रधान संस्कृतीत श्रमपरिहारासाठी जी गीते गायली जातात. त्यांची जातकुळी लावणीसारखीच असते. लावणी शब्दांचे साधर्म्य कृषि संस्कृतीतील पेरणी, लावणीशी देखील जोडले जाते. संत साहित्यानंतरचा काळ हा लावणीचा उदय काळ मानला जातो.

वेषभूषा :

लावणी नृत्यासाठी महाराष्ट्रातील परंपरेनुसार चालत आलेली नऊवारी साडी, विविध भरगच्च अलंकार, कमरपट्टा बिंदीसह पायात घुंगरू आणि केसांचा अंबाडा व त्यावर गजरा अशी वेशभूषा दिसून येते.

लावणीचे मुख्यत : तीन प्रकार पडतात.

१. नृत्यप्रधान लावणी

२. गानप्रधान लावणी

३. अदाकारी प्रधान लावणी

प्रारंभ काळात लावणी गेय स्वरूपात माहीत होती. नृत्यप्रधान लावणी हे अगदी अलीकडच्या काळातील रूप होय. जुन्नरी, हौद्याची, बालेघाटी, छक्कड, पंढरपुरी बाजाची अशी लावणीची विविध रूपे होत. जुन्नरी व हौद्याची लावणी प्रामुख्याने ढोलकी फडाच्या तमाशात सादर होते. बालेघाटी लावणी ही रागदारी थाटाची विलंबित लयीची लावणी होय. संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेत्या सत्यभामाबाई पंढरपूरकर यांनी पंढरपुरी बाजाच्या लावणीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. छक्कड म्हणजे द्रुत लयीतील उडत्या चालीची लावणी. यमुनाबाई वाईकर यांनादेखील लावणीतील विशेष योगदानाबद्दल संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांनी बालेघाटी लावणीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

भारत नृत्य महोत्सवात पॅरिसला माया जाधव यांनी लावणी सादर केली त्यामुळे लावणीला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त झाली. 'सुंदरा मनामध्ये भरली' हा लावणीवर आधारित कार्यक्रम अमेरिकास्थित मराठी कलावंत डॉ. मीना नेरूरकर यांनी सादर केला. त्यामुळे लावणीकडे अभिजनवर्ग वळला हे जरी खरे असले तरी गावोगावच्या जत्रांमधून, उत्सवांमधून लावणी पिढ्यानपिढ्या जनसामान्यांचे मनोरंजन करीत असल्याचे आजही आपल्याला दिसून येते.

७.४ भांगडा

भांगडा हे राष्ट्रीय ख्यातीचे लोकनृत्य आहे. भांगडा नृत्याचे उगम स्थान हे ल्यालपूर आहे. पीक आल्यानंतर पंजाबमध्ये लोक मोठ्या आनंदाने त्याचे नाचून स्वागत करतात आणि काही ठिकाणी तर शेतीच्या हंगामात गव्हाची पेरणी झाल्यापासून ते कापणी व मळणी होईपर्यंतच्या कालावधीत रोज रात्री सर्व जण मिळून हे नृत्य करतात. वैशाखी यात्रेबरोबर भांगड्याचा मौसम संपतो. उत्तम पिकाच्या आनंदाप्रीत्यर्थ किंवा विवाहासारख्या मंगलप्रसंगी हे नृत्य करण्याचा प्रघात रूढ आहे. गावातील युवक पौर्णिमेच्या रात्री एखाद्या शेतात एकत्र जमून ढोलाच्या तालावर हे नृत्य करतात. सळसळणारा चैतन्यपूर्ण जोम व उत्कट आनंदाचा प्रत्यय या नृत्यातून पहावयास मिळातो. पंजाबच्या सुफल-समृद्ध संस्कृतीचे प्रतिबिंब या नृत्यातून दिसून येते. पंजाबमधील सर्व लोकनृत्यात भांगडा हे फार लोकप्रिय, ओजस्वी आणि स्फूर्तिदायक लोकनृत्य मानले जाते .

वेषभूषा :

रंगीबेरंगी लुंग्या, पगड्या किंवा फेटे, हातात रुमाल, पायात पंजाबी जोडे (खुस्से), झब्बा, त्यावर जरीचे जाकीट अशी वेशभूषा करून व हातातील काठीला घुंगरू बांधून हे नृत्य करतात. काही नर्तक नाचतानाचता ढोल वाजवणाऱ्याच्या जवळ जाऊन पंजाबी लोकगीतांतील कडवी, उंच किंवा चढत्या स्वरात म्हणतात. या गाण्याच्या ओळीनंतर पुन्हा जोरदार नृत्य सुरू होते. अत्यंत उत्साहपूर्ण असे भांगडानृत्य सर्वांनाच आकर्षून घेते.

हे नृत्य करत असताना ढोलवादक हा मधोमध उभा असतो. इतर नर्तक त्याच्याभोवती वर्तुळाकार नृत्य करतात. मूळात हे समूहनृत्य असल्याने याला विशिष्ट नर्तनसंख्येचे बंधन नाही. नृत्यातील थकवा थोडासा दूर होऊन नृत्यात रंग भरावा किंवा स्फूर्ती मिळावी म्हणून 'हडिप्पा', 'बल्ले बल्ले', 'ओ बले बले' अशा जोशपूर्ण आरोळ्या देऊन हातात काठ्या



घेऊन, खांदे मोठ्या आकर्षकपणे उडवून, बोटाला हातरुमाल बांधून आणि उड्या मारून अनेक आकर्षक कसरती करत टाळ्या वाजवत हे नृत्य करतात.

प्रत्येक नृत्य हे गीताशी जोडलेले असते. पण नृत्याची रंगत वाढवण्यासाठी बरेचदा केवळ तालवाद्याच्या साथीवरही हे नृत्य केले जाते. या नृत्याला स्वतंत्र गायकाची जरूर नसते. एक नर्तक समोर येऊन आवेशपूर्ण ढंगामध्ये गाणे म्हणतो. या गीतामध्ये प्रेम, आनंद या भावनांबरोबरच कित्येकदा दुःख आपत्तीचेही चित्रण असते. रंगमंचावर हे नृत्य सादर करताना प्रथम ढोलवादक येतात व मागून नर्तक येतात. गळ्यात ढोल अडकवलेला वादक मध्यभागी उभे राहून दोन काठ्यांनी ढोल वाजवतो. त्याच्या दोन्ही बाजूंनी पारंगत नर्तक उभे राहून ते संपूर्ण नृत्याचे नेतृत्व करतात. ते मधूनमधून हाताचा पंजा कानावर ठेवून पुढे सरसावून पारंपरिक पंजाबी लोकगीतातील बोली अथवा ढोला देतात. ह्यावेळी नृत्यात काहीसा खंड पडतो व त्यानंतर पुन्हा जोमाने नृत्य सुरू होते. कित्येकदा एखाद्या नर्तकाच्या हातात लांब काठी असून तिच्या टोकावर अनेक रंगांनी सुशोभित केलेली लाकडी चिमणी बसवलेली असते. नर्तक तिची मान व शेपूट दोरीच्या साहाय्याने नृत्याच्या तालावर वर खाली करतो. त्यामुळे या नृत्याला किंचित विनोदाची झालर प्राप्त होते. हे लोकनृत्य असल्याने परंपरागत शरीर हालचालीखेरीज इतरही उत्स्फूर्त हालचाली करण्याचा प्रघात दिवसेंदिवस रूढ होत चाललेला आहे. हे मूलतः पुरुषी नृत्य असले तरी अलीकडे महिलांचाही त्यात सहभाग दिसतो. पुरुषी भांगडा नृत्यातील चैतन्य व जोम स्त्रियांच्या गिद्धा नामक नृत्यप्रकारातही दिसून येतो.

भारतातील नृत्यप्रकार कथकली (केरळ)

कथकली हे नृत्य दक्षिण भारतातील एक प्राचीन शास्त्रीय नृत्य आहे. केरळमध्ये या नृत्याचा विशेष प्रसार आढळतो. यामध्ये संगीत, अभिनय आणि कथानक यांचा सुरेख समन्वय साधलेला असतो. कथकलीमध्ये २० ते २२ कलाकारांचा एक संच असतो. त्यात गायक, वादक, रंगभूषाकारही (मेकअपमॅन) असतात. या नृत्यातून रामायण, महाभारत किंवा इतर कोणत्याही पौराणिक कथेचे सादरीकरण केले जाते. नर्तक स्वतः काही बोलत नाही. ज्या पात्रांचा संवाद असेल ते रंगमंचावर येऊन अभिनयातून संवाद व्यक्त करतात. सोबत गायल्या जाणाऱ्या संगीतबद्ध कवितांनुसार भावप्रदर्शन केले जाते.



स्वाध्याय

प्र.१ आधुनिक दृकश्राव्य साधनांचा वापर करून विविध नृत्यप्रकार प्रत्यक्ष बघून त्यांची वैशिष्ट्ये समजून घ्या.

प्र.२ विविध नृत्यप्रकारांसाठी आवश्यक असलेल्या वेशभूषेचे इंटरनेटद्वारे निरीक्षण करा.

प्र.३ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

(१) भरतनाट्यम् नृत्याचा क्रम लिहा.

(२) लावणीचे मुख्य तीन प्रकार कोणते ?

(३) भांगडा या नृत्यप्रकाराची वैशिष्ट्ये सांगा.

उपक्रम : इंटरनेटच्या सहाय्याने भरतनाट्यम्, कुचिपुडी, लावणी, भांगडा इत्यादी कलाकारांची अधिक माहिती मिळवा, तसेच परिसरातील प्रसिद्ध कलाकारांच्या मुलाखती/भेटी घ्या.



८. नाट्य



महाराष्ट्रातील नाट्यसंगीत (स्वातंत्र्योत्तर कालखंड)

विद्यार्थी मित्रांनो इयत्ता अकरावीच्या पाठ्यक्रमात आपण महाराष्ट्रातील नाट्यसंगीताचा स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील इतिहास पाहिला. विष्णुदास भावे यांनी १८४३ साली मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवली आणि पाहता पाहता मराठी नाटकाला शंभर वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने जुन्या लोकप्रिय संगीतनाटकांचे पुन्हा सादरीकरण करण्यात आले. नव्याने मराठी रसिकांच्या मनात मराठी नाटकांविषयी आकर्षण निर्माण झाले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात संगीतनाटकाचा विकास कसा होत गेला हे खालील मुद्द्यांच्या आधारे पाहता येईल.

१) **शिलेदार कुटुंबीयांचे योगदान :** मराठी रंगभूमीसाठी शिलेदार कुटुंबीयांनी मोलाचे योगदान दिले आहे. जयराम शिलेदार आणि जयमाला शिलेदार यांनी 'मराठी रंगभूमी' ही संस्था १९४९ मध्ये स्थापना केली. या संस्थेने अनेक जुनी संगीत नाटके नवीन संचात पुन्हा सादर केली. उदा. सौभद्र, संशयकल्लोळ, शारदा, शाकुंतल, मानापमान इत्यादी. विद्याधर गोखले यांनी 'स्वरसम्राज्ञी' हे नाटक रंगभूमीवर आणले. याशिवाय शिलेदार कंपनीने एखाद्याचे नशीब, मुंबईची माणसे, अभोगी ही नवीन नाटके सादर केली.

हे जाणून घ्या

व्यवसायिक दृष्ट्या विद्याधर गोखले यांची कामगिरी विशेष श्रेयस्कर ठरते. सुवर्णतुला या नाटकाचे त्यांनी सौभद्रच्या धर्तीने, भरगच्च संगीतप्रधान आणि शृंगार विनोदाच्या मिश्रणाने रोचक झालेले नाटक पुनरुज्जीवित केले. श्रीकृष्ण, बलराम, रुक्मिणी, सत्यभामा, नारद यांच्यासारखी परिचित पात्रे नव्या संदर्भात प्रेक्षकांसमोर आणली. छोटा गंधर्व, जयमाला शिलेदार, राम मराठे इत्यादी मराठी संगीत नाटकातील पारंपरिक पठडीतील कलावंत मंडळींनीदेखील संगीत रंगभूमीला दिलासा दिला.

२) **पु.ल. देशपांडे यांचे योगदान :** महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व असलेल्या पु. ल.देशपांडे यांनी सुद्धा संगीत नाटक विकसित करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. मराठी संगीत नाटकांसाठी त्यांनी पुष्कळ लिखाण केले. 'सुंदर मी होणार' या नाटकात त्यांनी एक संगीत पात्र घालून संगीत नाटकाच्या धर्तीवर संगीत दिले. पु.ल. केवळ लेखन करून थांबले नाहीत तर त्यांनी 'वाऱ्यावरची वरात' या नाटकात उत्कृष्ट हार्मोनियम वादन केले. 'तीन पैशांचा तमाशा' व 'ती फुलराणी' यांसारख्या नाटकात वातावरण निर्मितीसाठी त्यांनी विविध वाद्यांचा प्रयोग केला.

३) **पंडित जितेंद्र अभिषेकी यांचे योगदान :** पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी 'दि गोवा हिंदू असोसिएशन' ही नाटक संस्था स्थापना केली. वसंत कानेटकर यांच्या 'मत्स्यगंधा' आणि वि. वा.शिरवाडकर यांच्या 'ययाती – देवयानी' या नाटकांना त्यांनी संगीत दिले. त्यामुळे रामदास कामत व आशालता वाबगावकर यांच्यासारखे कलावंत रंगभूमीला मिळाले. पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या 'कट्यार काळजात घुसली' या नाटकाचे संगीत दिग्दर्शन पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी केले. वसंतरावांनी केलेली खाँसाहेबांची भूमिका आणि अभिषेकी यांचे संगीत यामुळे यातील नाट्यगीते अजरामर झाली. त्यानंतर रणजित देसाई यांचे ' हे बंध रेशमाचे', वसंत कानेटकरांचे 'मीरा मधुरा', 'मत्स्यगंधा' व 'लेकुरे उदंड जाहली' आणि वसू भगत यांचे 'वासवदत्ता' अशा अनेक नाटकांना पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी संगीत देऊन यातील नाट्यपदांना लोकप्रिय केले.

हे जाणून घ्या

कट्यार काळजात घुसली याची कथा दोन मातब्बर गवयांच्या स्पर्धेवर आधारित असल्याने याचे वातावरण खानदानी संगीताने धुंद होते. कै. वसंतराव देशपांडे यांनी खाँ साहेबांची भूमिका अजरामर केली आहे.

४) **स्त्री कलावंतांचे आगमन :** त्या काळी स्त्रियांनी संगीत शिकणे किंवा नाटकात काम करणे हे प्रतिष्ठेचे समजले जात नसे. त्यामुळे बालगंधर्व आणि केशवराव भोसले यांच्यासारखे पुरुष कलावंत रंगमंचावर आले. त्यांनी अनेक स्त्री भूमिका आपल्या सुमधुर आवाजाने व सक्षम अभिनयाने यशस्वीपणे साकारल्या. काळ बदलला आणि हिराबाई बडोदेकर, सरस्वती राणे, ज्योत्स्ना भोळे यासारख्या गायिकांनी परंपरा, अनिष्ट नीतिनियमांचे पाश झुगारून देत रंगमंचावर पदार्पण केले. त्यानंतर मात्र अनेक स्त्री कलाकार रंगमंचाकडे आकर्षित झाल्या. बकुळ पंडित, क्षमा वैद्य, मीनाक्षी कान्होपात्रा, आशा खाडीलकर, निलाक्षी जुवेकर, फैयाज, रजनी जोशी, मधुवंती दांडेकर या व अशा अनेक गायिका रंगमंचाची सेवा करू लागल्या.

५) **अभिनव प्रयोग :** मराठी रंगभूमीच्या इतिहासाच्या या टप्प्यात अनेक अभिनव प्रयोग करण्यात आले. संगीत नाटकात अनेक पात्रे रंगमंचावर येऊन नाटक सादर करीत असतात परंतु सुहासिनी मुळगावकर यांनी ‘सौभद्र’ हे नाटक एकपात्री अभिनयातून १९६० साली दिल्ली येथे सादर केले.या अभिनव प्रयोगाचे खूप कौतुक झाले. सुहासिनी मुळगावकर यांचा आदर्श घेऊन पुढे माया मल्लापूर आणि पद्माकर देव यांनी ‘संगीत स्वयंवर’ हे नाटक दोन पात्रांच्या माध्यमातून साकार केले. शिलेदार परिवाराने ‘सौभद्र’ व ‘स्वयंवर’ या नाटकाचा त्रिपात्री प्रयोग करून वाहवा मिळवली.

६) **लोकसंगीत व नाट्यसंगीत :** १९५७ नंतरच्या नाट्यसंगीतात अनेकविध गीतप्रकारांचा आणि गीतसादरीकरणाच्या नवीन पद्धतींचा समावेश झाला. त्यात लावणी, रागदारी, ख्याल, ठुमरी, टप्पा, तराणा, गझल, कजरी, अभंग, भजन, भावगीत, अभिनय गीत, द्वंद्व गीत, जुगलबंदी, शेर शायरी इत्यादी अनेकविध गीतप्रकारांच्या आणि ती सादर करण्याच्या अनेक पद्धतींचा अंतर्भाव दिसून आला. विजय तेंडुलकर यांच्या ‘घाशीराम कोतवाल’ या नाटकाला लोकसंगीताचा बाज असलेले संगीत देण्यात आले. रत्नाकर मतकरी यांच्या ‘लोककथा ७८’ या नाटकाला लोकसंगीतावर आधारित संगीत देण्यात आले.

७) **नाट्यसंगीताचे प्रात्यक्षिक :** मराठी नाट्यसंगीताचा विकास होत असताना यात अनेक प्रयोग करण्यात आले. यामध्ये नाट्यसंगीताचा प्रसार करण्यासाठी अनेक कलावंतांनी प्रात्यक्षिकांचे प्रयोग केले. नाट्यसंगीताच्या प्रात्यक्षिकांचा पहिला प्रयोग केला तो नानासाहेब जोग यांनी. यानंतर पुढे पु. ल. देशपांडे-रामभाऊ गुळवणी आणि वामनराव सडोलीकर-ह. रा. महाजनी या जोड्यांनी असे प्रयोग केले. छोटा गंधर्व आणि वसंतराव देशपांडे ही जोडी शास्त्रीय संगीतातील मूळ बंदिशी आणि त्यांचे नाट्यगीतात रूपांतर अशा सादरीकरणातून नाट्यसंगीताच्या विकासाच्या टप्प्यांचे विवेचन करत असे. पंडित हृदयनाथ मंगेशकर व चारूदत्त आफळे हे कलावंतही अशा प्रकारचे प्रयोग करीत असत.

८) **मैफलीतून नाट्यसंगीत :** नाट्यसंगीत हे शास्त्रीय संगीताचे अपत्य आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. पूर्वीच्या काळी संगीत नाटकांतील अनेक नाट्यगीते ही शास्त्रीय संगीताची हुबेहूब नक्कल असायची. त्यामुळे नाट्यसंगीताचा एक वेगळा श्रोता वर्ग निर्माण झाला. शास्त्रीय संगीताच्या मैफिलीत अनेक वेळा नाट्यसंगीतांची फर्माईश केली जायची. पुढेपुढे तर त्यांच्या केवळ नाट्यगीतांच्या मैफिली होऊ लागल्या. त्यात जुन्या पिढीतील इंदिराबाई खाडिलकर यांचे नाव घ्यावे लागेल. त्यानंतर कुमार गंधर्व, माणिक वर्मा व सध्या कीर्ती शिलेदार, प्रभाकर कारेकर, अजित कडकडे, अरविंद पिळगावकर, प्रसाद सावकार इत्यादी गायकांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. तसेच अहमदजान थिरकवाँ, विनायक थोरात, केशवराव नावेलकर, साई बँकर, हरीभाऊ देशपांडे, मधुकर खाडीलकर, राजीव परांजपे इत्यादी वादक साथीदाराचाही उल्लेख करावा लागेल.

रंगभूमीचे आधूनिक स्वरूप :

१९४३ साली सुरू झालेल्या मराठी रंगभूमीवर अनेक बदल घडत गेले. अनेक प्रयोग होत गेले. पूर्वी मनोरंजनाची

साधने नसल्यामुळे संगीत नाटके रात्रभर चालायची. त्यानंतर मूकपट व बोलपटांचा जमाना आला आणि संगीत रंगभूमीवर त्याचा परिणाम झाला. मनोरंजनाची साधने वाढली. धावत्या युगात व्यक्तींना वेळ मिळेनासा झाला. त्यामुळे पाच अंकी संगीत नाटकांऐवजी तीन अंकी, दोन अंकी व एकांकिकेसारखे नाट्यप्रकार उदयास आले. एकपात्री, मुकाभिनय, प्रहसन, स्वरनाटिका व कठपुतलीच्या धर्तीवर नाटके सादर करण्यात येत आहेत. या संगीत नाटकात भलेही अनेक स्थित्यंतरे घडून आली असली तरी रंगभूमी संगीताशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.

हे जाणून घ्या

बोलपटांच्या आगमनानंतर काही वर्षांतच मराठी रंगभूमीच्या विपन्नावस्थेला सुरुवात झाली. मात्र आचार्य अत्र्यांच्या ऐतिहासिक नाटकांनी काही काळ मराठी नाट्यव्यवसायात तजेला निर्माण केला. मो. ग. रांगणेकरांची नाट्यनिकेतन ही एकच संस्था बरेच दिवस तग धरून होती.

स्वाध्याय

प्र. १ स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मराठी संगीत रंगभूमीसाठी कोणकोणत्या कलाकारांनी योगदान दिले ?

प्र. २ आधुनिक मराठी रंगभूमीवर संगीताचे कोणकोणते प्रयोग केले गेले ?

उपक्रम :

(१) मराठी नाट्यसंगीताच्या सुवर्णकाळातील संगीत नाटके व स्वातंत्र्योत्तर नाटकांतील नाट्यपदे ऐकून त्यातील बदल अनुभवा.

(२) नाट्यसंगीताच्या मैफिली ऐका.

(३) फक्त नावे लिहा.

(i) संगीत नाटकातील वादक साथीदार

(ii) संगीत रंगभूमीवरील पुरुष कलाकार

(iii) पं. जितेंद्र अभिषेकी यांनी संगीत दिलेली नाटके

भरतनाट्यम्







९. चरित्रे

९.१ पं. विष्णू दिगंबर पलुस्कर



पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी संगीत क्षेत्रासाठी मोलाचे कार्य केले आहे. त्यांच्या जीवनकार्याचा आढावा खालील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

जन्म व बालपण :

पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांचा जन्म १८ ऑगस्ट, १८७२ रोजी कुरुंदवाड येथे झाला. त्यांचे मूळ आडनाव गाडगीळ असे होते. परंतु पलुस या गावी राहत असल्यामुळे त्यांचे आडनाव पलुस्कर असे पडले. त्यांचे वडील कीर्तनकार होते. त्यामुळे साहजिकच संगीताचा वारसा पंडितजींना लाभलेला होता. कुरुंदवाड संस्थानात दत्त जयंतीचा उत्सव चालू होता. या उत्सवात विष्णूजी शोभेची दारू उडवत होते. परंतु दुर्दैवाने शोभेच्या दारूचा स्फोट झाला आणि पलुस्करांच्या जीवनात कायमचा काळोख आला. अशा स्थितीत विष्णूंना शालेय शिक्षण घेणे अशक्य होते. म्हणून काही हितचिंतकांनी विष्णूंना संगीतसाधनेचा मार्ग दाखवला. अशा प्रकारे संगीत ज्ञानार्जन हेच त्यांच्या आयुष्याचे मुख्य ध्येय ठरले.

गुरू व शिक्षण :

पंडितजींच्या सुदैवाने त्यांना ग्वाल्हेर घराण्याचे भीष्माचार्य पं.बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्यासारखे थोर गुरू लाभले. वयाच्या पंधराव्या वर्षांपासून मिरज येथे पं. पलुस्करांची संगीत आराधना सुरू झाली. सुरुवातीला त्यांचा आवाज गाण्यायोग्य नव्हता. परंतु गुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अथक परिश्रम करून आवाज तयार केला.

आयुष्याला कलाटणी देणारा क्षण :

एकदा मिरज येथे सार्वजनिक सभेचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील सर्व प्रतिष्ठित व्यक्तींना या सभेसाठी निमंत्रित केले होते. परंतु या सभेसाठी पं. बाळकृष्णबुवांना निमंत्रित केले नव्हते. पं. पलुस्करांनी याबद्दल विचारणा केली असता असे उत्तर मिळाले की, 'वो तो गवय्या है, उन्हें क्यो बुलाना?' अशा प्रकारच्या उत्तराने विष्णूंना वाईट वाटले. त्यांच्या लक्षात आले की, आजही संगीततज्ज्ञांना समाजात प्रतिष्ठा नाही. त्याच प्रसंगी पंडितजींनी भीष्मप्रतिज्ञा केली की, जोपर्यंत संगीत क्षेत्रातील लोकांना प्रतिष्ठा मिळणार नाही तोपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही. हा क्षण त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला.

भारतभ्रमण :

मिरजेहून सातारा, बडोदा असे करत त्यांनी संपूर्ण हिंदुस्थानात भ्रमण केले. त्यांच्या मैफली गाजत होत्या. अनेक ठिकाणी राजदरबारात त्यांना दरबारी गायक म्हणून नोकरी मिळत होती. परंतु क्षणिक मोहाला बळी न पडता भारतीय संगीताच्या प्रसारासाठी सिलोन, नेपाळ, ब्रह्मदेश अशा देशांचा प्रवास केला.

गांधर्व महाविद्यालयाची स्थापना :

संगीताचा प्रसार व्हावा, सर्वसामान्य व्यक्तींना संगीताचे धडे देता यावेत यासाठी त्यांनी ५ मे, १९०१ रोजी लाहोर येथे गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली. त्यांनी परीक्षा पद्धतीनुसार अभ्यासक्रमाची रचना केली. विविध वाद्यांचा संग्रह केला. त्याचबरोबर वाद्य दुरुस्तीचा कारखानाही सुरू केला. छापखाना, ग्रंथालय, छात्रालय अशा सोयींमुळे अनेक विद्यार्थी संगीताकडे आकर्षित होऊ लागले. १९०८ साली मुंबई, पुणे व नागपूर येथे महाविद्यालयाच्या शाखा सुरू केल्या. सभागृहातून मैफिली होण्यास सुरुवात झाली. स्त्रियांना संगीत शिकता यावे यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांनी गांधर्व महाविद्यालयात पाच संगीत परिषदा

भरवल्या. त्यांनी पाश्चात्य स्वरलेखन पद्धतीचा अभ्यास केला. त्यातूनच पलुस्कर स्वरलिपीचा जन्म झाला.

पंडितजींचे राष्ट्रप्रेम :

स्वातंत्र्यलढ्यात पंडितजींनी मोलाचे योगदान दिले. ते स्वत: लोकमान्य टिळक व महात्मा गांधीजींचे भक्त होते. सभेच्या शेवटी वंदे मातरम् म्हणण्याची प्रथा त्यांनीच सुरू केली. यातून त्यांची राष्ट्रभक्ती दिसून येते.

पंडितजींची रामभक्ती :

पंडितजी हे उत्तम वक्ते होते. ते धार्मिक वृत्तीचे होते. तुलसी रामायणावर ते भक्तिभावाने प्रवचन करीत असत. 'रघुपती राघव राजाराम' या रामधुनची रचना पंडितजींनी केली. आयुष्याच्या उत्तरार्धात ते अध्यात्मातच रमू लागले. १९२४ मध्ये मुंबईतील त्यांच्या विद्यालयाच्या इमारतीचा लिलाव झाला. त्यामुळे दु:खाने त्यांनी वैराग्य पत्करले. भगवी कफनी धारण करून ते रामभक्तीत लीन झाले. अनेक चीजांमध्ये रामराम हे शब्द घेऊन ते गात असत. 'जय जगदीश हरे' या रचनेलाही त्यांनी संगीताचा साज चढवून ती रचना अजरामर केली. त्यांनी नाशिक येथे रामनाम आधार आश्रमाची स्थापना केली.

गायकी :

पं. बाळकृष्णबुवांकडून त्यांनी ग्वाल्हेर घराण्याची गायकी आत्मसात केली. स्थायी, अंतरा यांची मांडणी करून ते उत्तम प्रकारे ख्याल सादर करत. आलाप, विविध तानांचे प्रकार, बेहलावे अशा बाबी ते बेमालूमपणे सादर करीत असत. तराणा गाऊन ते मैफिलीची सांगता करत. त्यांचा आवाज पहाडी, कसदार व पल्लेदार होता. ध्वनिक्षेपक नसतानाही हजारो श्रोत्यांपर्यंत त्यांचा आवाज पोहोचत असे. त्यांचा आवाज तीनही सप्तकात सहज फिरत असे. ग्वाल्हेर घराण्याचे वैशिष्ट्य असलेला धमार व धृपद हा गीत प्रकार गाण्यात ते तरबेज होते. त्यांची प्रवृत्ती अध्यात्मिक असल्यामुळे त्यांना भजने गाण्यात विशेष रस होता.

ग्रंथ संपदा :

भारत भ्रमणातून मिळालेले ज्ञान व अनेक ग्रंथांचा अभ्यास करून पंडितजींनी जवळपास ६० ग्रंथांचे लेखन केले.

१. संगीत बालप्रकाश	१०. होरी
२. संगीत बालबोध	११. कर्नाटकी संगीत
३. राष्ट्रीय संगीत	१२. गीतावळी
४. संगीत शिक्षक	१३. महिला संगीत
५. राग प्रवेश	१४. भक्त प्रेम लहरी
६. व्यायाम संगीत	१५. भारतीय संगीत लेखनपद्धती
७. स्वरालाप गायन	१६. भजन अमृत लहरी
८. राग भैरव	१७. बालोदय
९. संगीत तत्त्वदर्शक	१८. संगीत अमृत प्रवाह

शिष्य संप्रदाय :

पंडितजी संगीताचे गाढे अभ्यासक तर होतेच परंतु त्याचबरोबर ते एक आदर्श गुरू होते. त्यांनी अनेक शिष्य घडवले. पं. ओंकारनाथ ठाकूर, पं. नारायणराव व्यास, पं. विनायक बुवा पटवर्धन, पं. वि.अ. कशाळकर, पं. शंकरराव बोडस,पं. डि. व्ही. पलुस्कर, पं. लक्ष्मणराव बोडस, प्रा. बी. आर. देवधर, पं. शंकरराव सप्रे

मृत्यू :

आयुष्यभर केलेल्या अथक परिश्रमांमुळे पंडितजी थकले होते. मुंबईतील त्यांच्या विद्यालयाचा झालेला लिलाव पाहून ते अधिकच खचले होते. शेवटी त्यांची प्रकृती ढासळत गेली आणि २१ ऑगस्ट, १९३१ रोजी मिरज येथे त्यांनी आपला देह ठेवला.

- पंडितजींच्या जीवनावर आधारित एका माहितीपटाची निर्मिती केली.
- केंद्र सरकारने पंडितजींच्या स्मरणार्थ पोस्टाचे तिकिट काढले.
- पंडितजींचे ऋण व्यक्त करण्यासाठी त्यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून संपूर्ण देशात दरवर्षी संगीतमहोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

ज्यांनी भारतीय संगीताला देशातच नव्हे तर इतर देशातही प्रतिष्ठा मिळवून दिली ज्यांनी निष्कलंक चारित्र्याचा ठसा उमटवून संगीताचे पावित्र्य राखले; गुरुभक्तीबरोबरच राष्ट्रभक्ती दाखवली. अनेक रचनांना संगीताचा साज चढवून त्या लोकप्रिय केल्या, बीभत्स व शृंगाररसाच्या बंदिशी काढून सर्वसामान्यांना रुचतील अशा भक्तिरसातील बंदिशी रचल्या, स्वरलिपीच्या बरोबरच अनेक ग्रंथांचे लेखन केले, ज्यांनी

गांधर्व महाविद्यालयाच्या व्यासपीठावरून सर्वांना संगीताचे ज्ञानामृत पाजले अशा पं. पलुस्करांना कोटी कोटी प्रणाम.

१.२ पं. रविशंकर



भारतीय संगीत जगभर मान्यता पावले, त्याला मानसन्मान, प्रतिष्ठा मिळाली. भारतीय संस्कृती व संगीताचे संस्कार श्रेष्ठ ठरले, एका जिद्दी पण शांत व्यक्तिमत्त्वाच्या वादकाने हे सारे घडवले, त्या कलावंताचे नाव म्हणजे पं. रविशंकर.

जन्म व बालपण :

भारतरत्न पंडित रविशंकर यांचा जन्म ७ एप्रिल १९२० रोजी वाराणसी (बनारस,काशी) येथे झाला. वडील शामाशंकर चौधरी हे त्या काळातील अतिशय उच्चविद्याविभूषित व्यक्तिमत्त्व होते. राजनितीबरोबरच संस्कृत भाषेवर प्रभुत्व असणारे शामाशंकर कायदे तज्ज्ञ होते. पं. उदयशंकर हे रविशंकरांचे मोठे बंधू महान नर्तक व चित्रकार होते. एकूणच हा सांगीतिक, सांस्कृतिक वारसा पं. रविशंकरांना मिळाला. बालपणापासूनच रविशंकरांना संगीताचे आकर्षण वाटू लागले व वयाच्या दहाव्या वर्षीच ते पं. उदयशंकरांच्या नृत्यसंचात दाखल झाले. बालपणीच ते या नृत्यसंचासोबत विदेश दौऱ्यावरही गेले.

नृत्याबरोबरच बासरी, शहनाई, व्हायोलिन, सारंगी अशा वाद्यांचीही ओळख होऊन वाद्यवादनाकडे रविशंकरांचा ओढा वाढू लागला. या नृत्यसंचामध्ये अनेक प्रथितयश कलावंतांचा सहवास रविशंकरांना लाभला आणि त्यांच्या जीवनाला महत्त्वपूर्ण वळण मिळाले.

शिक्षण :

उ. अल्लाउद्दीन खाँ हे पं. उदयशंकरांच्या नृत्य संचासमवेत एकदा युरोप दौऱ्यावर होते. त्या संचात रविशंकरही होते. रविशंकर यांच्या आईचे निधन झाले, हा आघात मोठा होता. या काळात उ. अल्लाउद्दीन खाँ यांनी रविशंकरांना पितृवत सांभाळले. युरोप दौऱ्यावर असताना अल्लाउद्दीन खाँ यांना इंग्रजी भाषेचे ज्ञान नसल्यामुळे रविशंकर त्यांचे दुभाष्याचे काम करत असत. खाँसाहेबांच्या सरोदवादनाचा व व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव रविशंकरांवर सातत्याने पडत होता. त्यामुळे खाँसाहेबांची जवळीक हळूहळू वाढू लागली. युरोप दौऱ्यावर असतानाच रविशंकरांनी स्वतंत्र अशा चित्रसेना नायक या कथानृत्याची रचना तयार करून सादर केली व रसिकांची वाहवा मिळवली. हे सर्व होत असताना खाँसाहेब हे सर्व जवळून पाहात होते व त्यांनी रविशंकरांना सल्ला दिला की कोणत्या तरी एका गोष्टीवर लक्ष केंद्रीत कर आणि रविशंकरांनीही खाँसाहेबांचे शिष्यत्व पत्करून संगीतावर लक्ष केंद्रीत केले.

युरोप दौऱ्याहून परत आल्यानंतर उदयशंकरांच्या नृत्यसंचातील वास्तव्य सोडून रविशंकरानी उ. अल्लाउद्दीन खाँ यांच्याकडे मैहर येथे जाऊन गुरुकुल पद्धतीने 'सतार' वादनाची तालीम घ्यायला सुरुवात केली. रविशंकर व अल्लाउद्दीन खाँ यांची भेट म्हणजे रविशंकरांच्या आयुष्यातील व भारतीय संगीताच्या इतिहासातील एक ऐतिहासिक घटना मानली जाते.

योग्य गुरू व स्वतःची अफाट श्रम करण्याची तयारी यामुळे गुरूंकडून त्यांना नेहमीच उत्तेजन मिळत गेले. अत्यंत कडक शिस्तीमध्ये सुमारे सहा वर्षे सतारवादनाची तालीम घेतली. यादरम्यान वडीलांचेही निधन झाले. गुरूंचा वरदहस्त, नित्य साधना व संगीतावर असलेली निस्सीम श्रद्धा या बळावर तणावपूर्ण काळातही सातत्याने त्यांनी आपल्या साधनेवर लक्ष दिले. खाँसाहेबांचे सुपुत्र उ. अली अकबर खाँ व कन्या अन्नपूर्णादेवी यांच्याबरोबर रविशंकरांना तालीम मिळत गेली. सतारवादनात होत असलेली प्रगती आणि गुरूच्या सहवासात मिळवलेले ज्ञान यामुळे अल्पावधीतच पं. रविशंकरजी एक प्रथितयश कलावंत म्हणून ओळखले गेले. त्याचाच परिणाम म्हणजे अलाहाबाद येथे झालेल्या संगीत महोत्सवामध्ये पं. रविशंकरांच्या सतारवादनाचा पहिला जाहीर कार्यक्रम झाला.

या दरम्यान खाँसाहेबांची कन्या अन्नपूर्णा देवी यांच्याशी पं. रविशंकरांचा विवाह झाला.

१९४५ सालापासून त्यांनी बॅलेसाठी संगीत रचना व चित्रपटासाठी संगीत दिग्दर्शन सुरू केले अनेक चित्रपटांना संगीत दिले.

चित्रपट संगीत दिग्दर्शन :

धरती के लाल, निचानगर, पथेर पांचाली, अपुरा संसार याचबरोबर चापा कोया, चार्ली व गांधी चित्रपटांसह काबुलीवाला, अनुराधा, गोदान, मीरा, दि चेरिटेल, दि फ्लूट अँड दी ॲरो अशा अनेक चित्रपटांना पं. रविशंकरांनी उत्कृष्ट संगीत दिले.

वैविध्यपूर्ण रचना, संगीत, दिग्दर्शन व इतर सांगितीक कार्य:

पं. रविशंकर दिल्ली येथील ऑल इंडिया रेडिओवर संगीत दिग्दर्शक म्हणून रुजू झाले. याच काळात त्यांनी वाद्यवृंद चेंबर ऑर्केस्ट्राची स्थापना केली.

- एच. एम. व्ही. (हिज मास्टर्स व्हाईस) या कंपनीच्या संगीत विभागात संगीत सहायक म्हणून महत्त्वपूर्ण कार्य.
- इंडियन पिपल्स थिएटरमध्ये नृत्य व नाट्याचे दिग्दर्शक म्हणून यशस्वी कामगिरी.
- 'अमर भारत' या कथानृत्याची रचना.
- 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' चे संगीत दिग्दर्शन.
- 'चंडालिका' या नृत्यनाटिकेचे संगीत दिग्दर्शन.
- विविध रागांवर आधारित वाद्यवृंद रचना, त्यामध्ये प्रामुख्याने काली बदरीया, निर्झर, उषा, रंगीन कल्पना अशा अनेक रचना लोकप्रिय झाल्या.
- 'सारे जहाँसे अच्छा' या गीताचे संगीत दिग्दर्शन.
- एशियाड क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने 'अथ स्वागतम् शुभ स्वागतम्' या स्वागतगीताचे यशस्वी संगीत संयोजन.
- भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त झालेल्या कार्यक्रमात राग-सुवर्ण जयंतीचे सादरीकरण.
- किन्नर स्कूल ऑफ म्युझिक या संस्थेची स्थापना

आंतरराष्ट्रीय कार्य :

सोव्हिएत युनियनमध्ये झालेली मैफिल ही त्यांची पहिली आंतरराष्ट्रीय मैफिल होय. यानंतर त्यांनी युरोप, अमेरिका येथे अनेक कार्यक्रम केले. त्यामध्ये प्रामुख्याने एडिनबर्ग फेस्टिव्हल, रॉयल फेस्टिव्हल हॉल येथे झालेल्या मैफिलींचा समावेश करावा लागेल.

बीटल्सपैकी एक असलेले जॉर्ज हॅरिसन यांनी रविशंकर यांच्याकडे सतार शिकण्यास सुरुवात केली. रविशंकरांनी जॉर्ज हॅरिसन यांच्यासोबत जॅझ संगीताचे अनेक कार्यक्रम केले. या माध्यमातून अभिजात पाश्चात्य व भारतीय संगीताच्या विविध प्रवाहांवर त्यांनी काम केले. म्हणूनच जॉर्ज हॅरिसन यांना पं. रविशंकर यांचे पॉपजगतातील मेंटर (पालक) मानले जाते. याच काळात रविशंकर यांनी मॉन्टेरी पॉप फेस्टिव्हल, वॅडस्टक फेस्टिव्हल यामध्ये भाग घेतला. शिवाय विदेशातील विविध महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये त्यांनी भारतीय संगीतावर अनेक व्याख्याने दिली.

न्यूयॉर्कच्या मॅडिसन स्क्वेअर गार्डनमधील 'कन्सर्ट फॉर बांगलादेश' या जॉर्ज हॅरिसन आयोजित कार्यक्रमात पं. रविशंकर यांचे सतारवादन झाले.

पाश्चात्य संगीत विश्वातील प्रसिद्ध व्हायोलिन वादक यहुदी मेनुहीन तसेच सरोदवादक उ. अली अकबर खाँ यांच्याबरोबरही पं. रविशंकर यांनी अनेक कार्यक्रमात जुगलबंदी केली आहे. याशिवाय संगीततज्ज्ञ फिलीप ग्रास यांच्या सोबतची 'पॅसेजेस' ही त्यांची एक उल्लेखनीय रचना आहे. फिलीप ग्रॅासच्या ओरायन रचनेत सतारवादक म्हणून पं. रविशंकर यांचा महत्त्वपूर्ण सहभाग राहिलेला आहे.

ग्रंथ संपदा :

(१) राग-अनुराग (बंगाली पुस्तक)
(२) म्युझिक मेमरी (इंग्रजी पुस्तक)
(३) माय म्युझिक माय लाईफ (आत्मचरित्र)
(४) लर्निंग इंडियन म्युझिक-ए-सिस्टिमॅटिक ॲप्रोच (इंग्रजी पुस्तक)

मान सन्मान व पुरस्कार :

(१) भारत सरकारने राष्ट्रपती पदक देऊन सन्मानित केले.
(२) भारत सरकारकडून पद्मभूषण
(३) भारताच्या राज्यसभेचे सदस्यत्व
(४) स्वीडन येथील पोलार म्युझिक प्राईज
(५) भारत सरकारकडून पद्मविभूषण, देशिकोत्तम
(६) भारत सरकारचा सर्वोच्च असा **भारतरत्न**
(७) फ्रान्सचा सर्वोच्च नागरी सन्मान लिजियन ऑफ ऑनर
(८) राणी दुसरी एलिझाबेथ यांच्याकडून ऑनररी नाईट हूड
(९) सॅनदिएगो विद्यापीठाच्या वतीने फाऊंडिंग ॲम्बॅसेडर फॉर ग्लोबल एमिटी ॲवॉर्ड
(१०) विविध विद्यापीठांच्या वतीने चौदा डि. लिट पदव्या
(११) वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमकडून ग्लोबल ॲम्बॅसेडर ही उपाधी
(१२) मॅगसेसे पुरस्कार

(१३) तीन वेळा ग्रॅमी अ‍ॅवॉर्ड

(१४) पं. रविशंकर यांच्या जीवनावर आधारित आलाप हा माहितीपट.

नवराग निर्मिती :

पं. रविशंकर यांनी आपल्या संगीतसाधनेबरोबरच काही नवीन रागांचीही निर्मिती केली. त्यामध्ये बैरागी, तिलकशाम, मोहनकंस, नटभैरव इत्यादी रागांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. याशिवाय परमेश्वरी, रंगेश्वरी, सिहेंद्र मध्यम, रसिया, चारुकेशी, अहीर ललत, जोगेश्वरी इत्यादी दक्षिणात्य राग उत्तर भारतीय संगीत पद्धतींमध्ये प्रचलित केले.

वादन वैशिष्ट्ये :

'प्रभावी नादाघात' हे पंडितजींच्या वादनाचे खास वैशिष्ठ्य म्हणता येईल. आलाप, जोड, झालाच्या माध्यमातून नेटक्या रितीने रागाचे संपूर्ण शास्त्रशुद्ध रूप ते उभे करत असत. पारंपरिक रागांबरोबरच अप्रचलित रागातही सहजगत्या, सौंदर्यपूर्ण ढंगाने कौशल्याने वादन करणे ही पंडितजींची खासियत होती.

वादनातून भावप्रदर्शन हा त्यांच्या कलाविष्काराचा महत्त्वाचा पैलू मानतात. त्यांच्यामध्ये श्रोत्यांशी स्वरांच्या माध्यमातून संवाद साधण्याची कला व सामर्थ्य होते. वादनात रंगत आणण्यासाठी सवाल-जवाब हा प्रकारही ते अनोख्या पद्धतीने सादर करत.

समयसूचकता व श्रोत्यांना काय पाहिजे याची नाडी ते ओळखत. भारतात वादन असताना एक राग बराच वेळ आळवला तरी चालतो, पण परदेशात मात्र थोड्या वेळात अनेक रचना ते मांडत. यामुळे पाश्चात्य देशातसुद्धा पं. रविशंकर भारतीय संगीत लोकप्रिय करू शकले.

शिष्य परंपरा :

जया बोस, उमाशंकर मिश्र, गोपाळकृष्ण, विजय राघवराव, कार्तिककुमार, शंकर घोष, जॉर्ज हॅरिसन, कन्या अनुष्का शंकर असे अनेक शिष्य त्यांनी घडवले.

मृत्यु :

आयुष्याच्या अखेरपर्यंत देशविदेशात भारतीय संगीतातील सौंदर्याचा परिचय पं. रविशंकर यांनी यशस्वीपणे करून दिला. रविशंकर यांचा मृत्यू दिनांक १२ डिसेंबर २०१२ रोजी सॅनदिएगो (अमेरिका) येथे झाला.

९.३ पं. मृणालिनी साराभाई



भारतीय नृत्याचा प्रसार करून त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी अनेक कलावंतांनी हातभार लावला. त्यामधून सामाजिक संदेश जनसामन्यापर्यंत पोहोचवण्याचे कार्य करणाऱ्या, पारंपरिक कलेला विज्ञानाची जोड देणाऱ्या महान नर्तिका म्हणजे पं. मृणालिनी साराभाई होय. त्यांच्या जीवनकार्याचा आढावा खालील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

जन्म व बालपण :

चेन्नई येथे ११ मे १९१८ रोजी उच्चशिक्षित परिवारात पंडिता मृणालिनी साराभाई यांचा जन्म झाला. रचनात्मकता व कल्पकता त्यांच्यामध्ये लहानपणापासून दिसत होती. जेव्हा त्या चार वर्षाच्या होत्या तेव्हा कुठलेही गाणे ऐकले की त्या गाण्यावर थिरकायला व नृत्याभिनय करायला लागत.

शिक्षण :

पंडिता मृणालिनी साराभाई यांचे प्रारंभिक शिक्षण स्वित्झर्लंडमध्ये झाले होते. तिथे त्यांनी काही पाश्चात्य नृत्यशैलींचेही अध्ययन केले होतो. भारतात आल्यानंतर शिक्षणासाठी शांतिनिकेतन येथे गेल्या. त्या ठिकाणी त्यांना रवींद्रनाथ टागोर आणि नंदलाल बोस हे महान गुरू लाभले. या दोन गुरूंच्या सान्निध्यात मृणालिनी यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व घडले. पंडिता मृणालिनी साराभाई यांनी भरतनाट्यम्, मोहिनीअट्टम्, कथकली आणि मणिपुरी नृत्याचे शिक्षण गुरू मिनाक्षी सुंदरम् पिल्लई, मत्थुकुमार पिल्लई, चोक्कलिंगम पिल्लई आणि कुंजुकुरूप अशा महान गुरूंकडून मिळवले होते. त्याचप्रमाणे अमेरिकन ॲकॅडमी ऑफ ड्रामॅटिक आर्ट्समधूनही त्यांनी प्रशिक्षण घेतले होते. या सर्वांचा मिलाप यांच्या नृत्यामध्ये होता.

कार्य :

पंडिता मृणालिनी यांनी पारंपरिक कलांना शास्त्र, विद्या आणि विज्ञानाशी जोडण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. त्यांनी आपल्या कलेला सामाजिक घडामोडींशी जोडले आणि ज्वलंत सामाजिक मुद्दे जोरदारपणे आपल्या नृत्यरचना आणि नृत्यनाटिकांच्या माध्यमातून मांडले. १९६०-६१ च्या दशकात जेव्हा गरीब घरातील मुली हुंडाबळी पडायच्या तेव्हा मृणालिनींनी हुंड्याची समस्या केंद्रस्थानी ठेवून नृत्याची संरचना तयार केली. त्यांनी नारी सबलीकरण, अस्पृश्यता, मानवाधिकाराचे दहन, मानवी मूल्यांचे अवमूल्यन आणि पर्यावरण इत्यादी अनेक विषयांकडे लोकांना आकर्षित केले. या कार्यामध्ये त्यांना पं. राम गोपाल आणि सी. पण्णिकरांसारख्या विद्वान आणि प्रयोगशील नृत्यशिल्पींचाही महत्त्वपूर्ण सहयोग मिळाला.

जगप्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. साराभाई यांच्याशी विवाह झाल्यानंतर त्या गुजरातमधील अहमदाबाद शहरात स्थायिक झाल्या. १९४८ मध्ये त्यांनी 'दर्पण ॲकॅडमी ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स' याची स्थापना केली. तिथे वेगवेगळ्या कलाविद्यांचे शिक्षण दिले जाते. १८०० पेक्षा अधिक विद्यार्थी विद्यार्थिनी येथून प्रशिक्षित झाले आहेत.

पुरस्कार :

मृणालिनी यांना पद्मश्री पुरस्कार, पद्मभूषण पुरस्काराने अलंकृत केले आहे. त्यांना संगीत नाटक ॲकॅडमीने फेलोशिप प्रदान केली होती. फ्रेंच अर्काईव्हजकडून पदक आणि डिप्लोमा मिळवणारी ही प्रथम भारतीय महिला होती. मेक्सिकन सरकारने त्यांच्या प्रभावशाली नृत्यनाटिकांसाठी त्यांना सुवर्णपदक देऊन सन्मानित केले होते. तसेच त्यांना इतरही राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाले होते.

प्रख्यात नृत्यांगना, अभिनेत्री आणि समाजसेविका मल्लिका साराभाई या मृणालिनी यांच्या कन्या आहेत. मृणालिनी यांनी 'मृणालिनी साराभाई : द वॉईस ऑफ द हार्ट' या नावाचे स्वतःचे आत्मचरित्र लिहिले आहे.

अशा या महान नृत्यांगना नृत्य जगतात 'अम्मा' म्हणून ओळखल्या जात होत्या. २१ जानेवारी २०१६ रोजी त्यांचे निधन झाले.

९.४ बालगंधर्व



महाराष्ट्रातील नाट्यसंगीताच्या इतिहासात मानाचा तुरा खोवणारे , ज्यांनी आपल्या मधुर आवाजाने व परीपक्व अभिनयाने महाराष्ट्राची रंगभूमी गाजवली, ज्यांनी गंधर्वयुगाची सुरुवात केली. पुरुष असूनही तब्बल ५० वर्षे ज्यांनी स्त्री-भूमिका सादर करून रसिकांच्या मनावर अधिराज्य केले, असे दैवी कलावंत म्हणजे बालगंधर्व होय.

अशा या बालगंधर्वांच्या जीवनकार्याचा आढावा खालील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

जन्म व बालपण :

नारायण श्रीपाद राजहंस हे बालगंधर्वांचे नाव. त्यांचा जन्म २६ जून , १८८८ रोजी सांगली जिल्ह्यातील नागठाणे येथे झाला. संपूर्ण राजहंस कुटुंब संगीतप्रेमी होते. त्यांचे मामा वासुदेवराव पुणतांबेकर हे 'नाट्य कला प्रवर्तक' नाटक मंडळीच्या संस्थापकांपैकी एक होते. बालगंधर्वांना त्यांच्या वडिलांनी शिक्षणासाठी जळगावला पाठवले. तेथे बालगंधर्वांना अनेक नाटके पाहण्याचा योग आला. अशा प्रकारे त्यांना गायन व नाट्याचे बाळकडू मिळाले.

गुरू आणि शिक्षण :

जळगावात मेहबूब खाँ हे एक उत्तम गायक राहत होते. त्यांच्याकडे नारायणरावांनी संगीताचे धडे घेण्यास प्रारंभ केला. खाँसाहेबांनी बालगंधर्वांना स्वरसाधना, स्पष्ट शब्दोच्चार व रागदारीचे शिक्षण देऊन त्यांचा गायनाचा पाया पक्का केला. याच काळात प्रसिद्ध गायक भास्करबुवा बखले यांनी मूळातच सुरेल आवाज असलेल्या बालगंधर्वांना साभिनय पदे, रंगभूमीवरील गायनकौशल्य, घरंदाज गायकी

इत्यादी बाबी शिकवल्या. पं. गोविंदराव टेंबे व उ. अल्लादिया खाँ यांच्याही गायकीचा प्रभाव बालगंधर्वांवर होता.

बालगंधर्व पदवी :

लोकमान्य टिळकांना पुण्यामध्ये चिमुकल्या नारायणाचे गाणे ऐकण्याचा योग आला. नारायणाचे गाणे मोहक व मधुर होते. ते ऐकून लोकमान्य टिळक भारावून गेले. त्यांनी उत्स्फूर्तपणे उद्‌गार काढले, अरे! हा तर साक्षात बालगंधर्व! तेव्हापासून नारायणरावांना 'बालगंधर्व' ही पदवी मिळाली ती कायमचीच.

किर्लोस्कर नाटक मंडळीत प्रवेश :

लोकमान्य टिळकांनी नारायणाला १९०५ मध्ये किर्लोस्कर नाटक मंडळीत प्रवेश मिळवून दिला. तेव्हा नाटकातील स्त्री-भूमिका पुरुषच करत. अशा काळात सौंदर्य लाभलले व गोड गळ्याची देणगी लाभलेले बालगंधर्व हे रंगभूमीसाठी वरदान ठरले.

गंधर्व नाटक मंडळीची स्थापना :

अण्णासाहेब किर्लोस्करांच्या निधनानंतर बालगंधर्वांनी १९१३ मध्ये गंधर्व नाटक मंडळीची स्थापना केली.

परंपरागत गोष्टींना छेद देत बालगंधर्वांनी नवनवीन बाबी रंगमंचावर आणल्या. विविध देखाव्यांचे पडदे आणून नेपथ्यात आमूलाग्र बदल केले. वेशभूषा, साजशृंगारांची साधने, रंगभूषेसाठी विविध उपकरणे त्यांनी रंगमंचावर आणली . नाट्यानुरूप संगीत, प्रसंगानुरूप रंगमंचावरील हालचाली, प्रभावी नाट्याभिनय अशा बाबींचा त्यांनी विचार केला. अशा प्रकारे बालगंधर्वांनी गंधर्वयुगाची सुरुवात केली.

स्त्रियांचे नटणे, मुरडणे, हावभाव या गोष्टींबरोबरच स्त्रियांचे अंतरंग प्रकट करणे अशा बाबी ते लीलया करीत असत. त्यामुळे त्यांच्या स्त्री-भूमिका पाहण्यासाठी व त्यांचे गायन ऐकण्यासाठी नाट्यप्रेक्षक एकच नाटक अनेक वेळा पाहत असत. तसेच त्यांच्या पदांना अनेक वेळा वन्समोअर मिळत असे. वन्समोअर मिळाल्यानंतर प्रत्येक वेळी ते पद वेगवेगळ्या ढंगामध्ये सादर करत असत. बालगंधर्वांची वेशभूषा, दागिने पाहून कित्येक कुलीन स्त्रिया त्यांचे अनुकरण करीत असत. त्या काळी गंधर्व फॅशनच रूढ झाली होती. अशा प्रकारे त्यांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य केले.

संगीत नाटके व स्त्री - भूमिका :

बालगंधर्वांनी १९०६ ते १९५५ या काळात जवळपास २७ स्त्री भूमिका रंगवल्या. त्यांनी पहिली स्त्री भूमिका



शाकुंतल नाटकात केली. त्यानंतर सौभद्रमधील सुभद्रा, मानापमानमधील भामिनी. स्वयंवरमधील रुक्मिणी, विद्याहरणमधील देवयानी, शारदामधील शारदा, मृच्छकटीकमधील वसंतसेना व एकच प्याला या नाटकातील सिंधू अशा अनेक स्त्री भूमिका त्यांनी अजरामर केल्या.

गायकी :

भास्करबुवांच्या गायकीत ग्वाल्हेर, आग्रा अशा घराण्यांच्या गायकीचा संगम झाला होता. याचा प्रभाव बालगंधर्वावर असला तरी त्यांनी आपली वेगळी गायनशैली विकसित केली होती. त्यांचे मधुर गायन श्रोत्यांच्या अंतःकरणाला भिडत असे. ते लयीचे पक्के होते. स्पष्ट शब्दोच्चार, दाणेदार तान, याचबरोबर लडिवाळपणा व मादकता यांचा मिलाफ त्यांच्या गायकीत झाला केला.

फिल्म कंपनीत पदार्पण :

बालगंधर्वांनी गंधर्व नाटक मंडळी बंद झाल्यानंतर १९३५ मध्ये प्रभात फिल्म कंपनीच्या धर्मात्मा चित्रपटामध्ये भूमिका केली. परंतु या एकाच चित्रपटानंतर बालगंधर्वांनी प्रभात फिल्म कंपनी सोडली.

मानसन्मान :

- पुणे येथे भरलेल्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष होण्याचा बहुमान त्यांना मिळाला.
- संगीत नाटक अकादमीने अभिनयासाठी राष्ट्रपती पदक देऊन त्यांचा गौरव केला.

- भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा पुरस्कार दिला.
- त्यांच्या जीवनावर आधारित बालगंधर्व हा चित्रपट प्रदर्शित झाला.

मृत्यू :

४ जून १९५५ पर्यंत म्हणजेच वयाच्या ६७ व्या वर्षांपर्यंत त्यांनी रंगमंचावर भूमिका केल्या. त्यांची 'एकच प्यालातील' सिंधूची भूमिका अखेरची ठरली. त्यानंतर आजारपणामुळे ते भूमिका करू शकले नाहीत. यातच दि. १५ जुलै, १९६७ रोजी पुणे येथे आयुष्याच्या रंगमंचाचा अखेरचा निरोप घेतला.

स्वाध्याय

प्र. १ योग्य जोड्या लावा.

अ.क्र.	'अ'	'ब'
१	बालगंधर्व	दर्पण ॲकॅडमी
२	पं.रविशंकर	गंधर्व नाटक मंडळी
३	मृणालिनी साराभाई	गांधर्व महाविद्यालय
४	पं.वि.दि. पलुस्कर	किन्नर स्कूल ऑफ म्युझिक

प्र.२ टीपा लिहा.

(१) पं. वि. दि. पलुस्कर यांची ग्रंथसंपदा

(२) पं. रविशंकर यांना मिळालेले पुरस्कार

(३) मृणालिनी साराभाई यांचे सांगीतिक कार्य

प्र.३ फक्त २-२ नावे लिहा.

(१) पं. रविशंकर यांनी संगीत दिलेले चित्रपट

(२) मृणालिनी साराभाई यांचे गुरू

(३) पं. वि. दि. पलुस्कर यांचे शिष्य


प्र. ४ बालगंधर्व यांची नाटके, त्यातील त्यांची भूमिका आणि लोकप्रिय नाट्यगीते याचा तक्ता पूर्ण करा.

क्र.	नाटके	नाटकातील भूमिका	लोकप्रिय नाट्यगीते

उपक्रम : इंटरनेटच्या सहाय्याने गायन, वादन, नृत्य, नाट्य या क्षेत्रातील प्रसिद्ध कलाकारांची अधिक माहिती मिळवा, तसेच परिसरातील प्रसिद्ध कलाकारांच्या मुलाखती/भेटी घ्या.

हे जाणून घ्या

पंडित भीमसेन जोशी



भारतीय संगीताला पडलेले एक सोनेरी स्वप्न म्हणजेच किराणा घराण्याचे पंडित भीमसेन जोशी होय. ज्यांनी अभंगवाणीतून महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातील घराघरात आपला स्वर पोहोचवला, आपल्या बुलंद व पहाडी आवाजाने देश विदेशात अभिजात शास्त्रीय संगीत पोहोचवले असे महान भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या जीवनकार्याचा आढावा पुढील मुद्द्यांच्या आधारे पाहूया.

जन्म व बालपण :

पंडित भीमसेन जोशी यांचा जन्म ४ फेब्रुवारी १९२२ रोजी कर्नाटकातील रोना या गावी झाला. त्यांचे वडील गुरूराज हे एक शिक्षक होते. भीमसेनने संगीताकडे न वळता वैद्यकीय अथवा अभियांत्रिकी शिक्षण घ्यावे असा त्यांचा आग्रह होता. परंतु संगीतात रमणाऱ्या भीमसेनला हे पटले नाही. अखेर भीमसेनांनी घर सोडण्याचे निश्चित केले. संगीत शिक्षणाची अभिलाषा मनात ठेवून त्यांनी वयाच्या अकराव्या वर्षी घर सोडले आणि ते ग्वाल्हेरात दाखल झाले. त्यांनी गायनाच्या तळमळीपायी उत्तर भारतात अनेक ठिकाणी पायपीट केली.

गुरू आणि शिक्षण :

सुरुवातीला त्यांनी इनायत खाँ यांचे शिष्य जनाप्पा कुर्तकोटी यांच्याकडून गायनाची तालीम घेतली. त्यानंतर जालंदर येथे पंडित मंगतराम यांच्याकडे व ग्वाल्हेर येथे राजाभैय्या पूंछवाले यांच्याकडेही गाण्याचे शिक्षण घेण्याचे त्यांना भाग्य लाभले. त्यानंतर ते रामपूर येथे मुश्ताक हुसेन खाँ यांच्याकडे काही काळ शिकले. त्यानंतर त्यांचा शोध घेत असलेल्या वडीलांनी भीमसेन यांना पुन्हा घरी परत आणले. भीमसेनांची संगीत शिक्षणाची तीव्र ओढ पाहून वडील भीमसेनांना घेऊन जवळच असलेल्या कुंदगोळ गावातील रामभाऊ कुंदगोळकर यांच्याकडे गेले आणि रामभाऊंनी भीमसेनांना शिष्य म्हणून स्वीकारले. रामभाऊ सवाई गंधर्व म्हणून ख्यातनाम होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, भीमसेनांनी हिंदुस्थानी शास्त्रीय गायनाचे धडे घेतले.

पुरस्कार व मानसन्मान :

भीमसेन जोशी यांनी केलेल्या अथक परिश्रमाचे द्योतक म्हणून त्यांना अनेक मानसन्मान मिळाले.

